अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | बुधवार
१८.११.२०२६

वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 9763157712

वर्ष: ०७ | अंक: २८८ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन ७ ते १८ डिसेंबर दरम्यान

दुष्काळ, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर होणार चर्चा : विदर्भाच्या विकासासाठी विशेष घोषणांकडे लक्ष

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नागपूर - राज्य विधिमंडळाचे यंदाचे हिवाळी अधिवेशन ७ ते १८ डिसेंबर २०२६ या कालावधीत नागपूर येथे आयोजित करण्यात येणार आहे. बुधवारी विधानभवनात पार पडलेल्या विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत अधिवेशनाच्या कालावधीवर अधिकृत शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यामुळे नागपूर येथे होणाऱ्या या अधिवेशनात राज्यातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार चर्चा होण्याची शक्यता आहे.

या अधिवेशनात राज्यातील दुष्काळी परिस्थिती, पाणीटंचाई, जलसंधारणाची कामे आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत या प्रश्नांना प्राधान्य मिळण्याची शक्यता आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचे असमान प्रमाण आणि पाणीटंचाईच्या समस्येमुळे ग्रामीण भागातील जनजीवन तसेच शेती व्यवसाय प्रभावित होत आहे. त्यामुळे दुष्काळी उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी, पिण्याच्या पाण्याचे नियोजन आणि जलसंधारणासाठी मंजूर निधीच्या विनियोगाबाबत विरोधक सरकारला जाब विचारण्याची शक्यता आहे. विशेषतः विदर्भातील प्रलंबित विकासकामे आणि अनुशेषाचा प्रश्न या अधिवेशनात पुन्हा ऐरणीवर येण्याची चिन्हे आहेत. विदर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी, सिंचन प्रकल्प, रस्ते, रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक विकास यासंदर्भात सरकारकडून कोणत्या घोषणा केल्या जातात, याकडे संपूर्ण विदर्भाचे लक्ष लागले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून विदर्भासाठी काही विशेष घोषणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पर्यावरण संवर्धन, विकासकामांचे नियोजन आणि निधीचा योग्य वापर या मुद्द्यांवरही सदस्यांकडून प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात. विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीला विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषद सभापती राम शिंदे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधानपरिषद उपसभापती सचिन अहिर, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह सर्वपक्षीय प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत अधिवेशनाच्या कामकाजाचा कालावधी निश्चित करण्यात आला.

'लश्करचा शेवटचा स्थानिक दहशतवादी ठार!'

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचे विधान : सुरक्षा दलांचे कौतुक

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नवी दिल्ली - जम्मू-काश्मीरमधील कुलगाम येथे लश्कर-ए-तैयबाचा दहशतवादी लतीफ भट याला सुरक्षा दलांनी ठार केल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जवानांचे कौतुक केले आहे. लतीफ भट हा खोऱ्यातील लश्कर-ए-तैयबाचा शेवटचा सक्रिय स्थानिक दहशतवादी होता, असे अमित शाह यांनी म्हटले आहे. या कारवाईत जम्मू-काश्मीर पोलीस, भारतीय लष्कर, सीआरपीएफ आणि गुप्तचर यंत्रणांनी संयुक्तपणे सहभाग घेतला.

बुधवारी पहाटे कुलगाम परिसरात सुरक्षा दलांनी संयुक्त ऑपरेशन राबवले. या कारवाईत लश्कर-ए-तैयबाचा दहशतवादी लतीफ भट याला ठार करण्यात आले. या ऑपरेशनमध्ये विविध सुरक्षा यंत्रणांमधील समन्वय आणि नियोजन महत्त्वाचे ठरल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले. अमित शाह यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'द' वर पोस्ट करत सुरक्षा दलांच्या कामगिरीचे कौतुक केले. सर्व सुरक्षा यंत्रणांमध्ये उत्कृष्ट समन्वय दिसून आला असून, या संयुक्त कारवाईमुळे दहशतवादाविरोधातील मोहिमेला महत्त्वपूर्ण यश मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

एक दिवस आधी आणखी एका दहशतवाद्याचा खात्मा

या कारवाईपूर्वी कुलगाममध्ये दहशतवादी उमर निसार यालाही सुरक्षा दलांनी ठार केले होते. लतीफ भटचा साथीदार असलेल्या उमर निसारचा एक दिवस आधी खात्मा करण्यात आल्याची माहिती अमित शाह यांनी दिली. या दोन्ही कारवायांमध्ये जम्मू-काश्मीर पोलीस, भारतीय लष्कर, केंद्रीय राखीव पोलीस दल आणि गुप्तचर यंत्रणांनी एकत्रितपणे काम केले. जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादाविरोधात सुरक्षा दलांकडून सुरू असलेल्या कारवायांच्या पार्श्वभूमीवर कुलगाममधील ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे. लश्कर-ए-तैयबाच्या स्थानिक दहशतवादी नेटवर्कविरोधात सुरक्षा यंत्रणांकडून सुरू असलेल्या मोहिमेत या कारवाईमुळे मोठे यश मिळाल्याचा दावा केंद्रीय गृहमंत्र्यांनी केला आहे.

थोडक्यात

गिरीश महाजनांसह महायुतीचे १२ उमेदवार बिनविरोध

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

जळगाव - राज्याचे लक्ष लागलेल्या जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत महायुतीने आघाडी घेतली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या अंतिम दिवशी १२ जागांवर एकच उमेदवार राहिल्याने महायुतीचे १२ उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. यामध्ये मंत्री गिरीश महाजन आणि पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्यासह भाजपचे चार, शिवसेनाचे सहा आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन उमेदवारांचा समावेश आहे. उर्वरित नऊ जागांसाठी २९ उमेदवार निवडणूक रिंगणात असून सर्व जागांवर महायुतीचे उमेदवार विजयी होतील, असा विश्वास मंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला. जिल्हा बँकेच्या २१ जागांसाठी तब्बल ४०२ इच्छुकांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

चंद्रपूरच्या मुख्य चौकात अज्ञात व्यक्तीचे शीर आढळल्याने खळबळ!

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

इंदिरा गांधी पुतळ्याच्या परिसरात आढळले शीर

श्वानपथकाच्या मदतीने काही अंतरावरील रेल्वे उड्डाणपुलाखाली धडही आढळले



चंद्रपूर - चंद्रपूर शहरातील सर्वाधिक वदळींच्या आणि मध्यवर्ती भागातील प्रियदर्शनी इंदिरा गांधी चौकात एका अज्ञात पुरुषाचे शीर आढळल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण शहरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रियदर्शनी इंदिरा गांधी चौकातील सौंदर्यीकरण करण्यात आलेल्या इंदिरा गांधी यांच्या पुतळ्याच्या मागील बाजूस एका पुरुषाचे शीर आढळून आले. ही बाब लक्षात येताच परिसरात एकच गर्दी जमली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिसराची पाहणी सुरू केली. दरम्यान, पोलिसांनी श्वानपथकाच्या मदतीने तपासाची दिशा निश्चित करण्याचा प्रयत्न केला. श्वानपथकाने माग काढल्यानंतर काही अंतरावर रेल्वे उड्डाणपुलाखाली जाहिरातींच्या फलकाच्या खांबाजवळ संबंधित व्यक्तीचे उर्वरित धड आढळून आले. या प्रकारामुळे पोलिसांसमोर गंभीर तपासाचे आव्हान उभे राहिले आहे.

प्राथमिक अंदाजानुसार, संबंधित व्यक्तीची अन्यत्र हत्या करून मृतदेहाचे अवशेष शहरातील या परिसरात आणून टाकण्यात आले असावेत, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, या घटनेमागील नेमके कारण, हत्येचे ठिकाण आणि संबंधित व्यक्तींची भूमिका याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. घटनास्थळी पोलिसांकडून तपासणी करण्यात येत असून मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. तसेच परिसरातील परिस्थिती आणि उपलब्ध पुराव्यांच्या आधारे या प्रकरणाचा तपास पुढे नेण्यात येत आहे. चंद्रपूर शहराच्या अत्यंत गजबजलेल्या आणि महत्त्वाच्या चौकात अशा प्रकारची धक्कादायक घटना उघडकीस आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आणि भीतीचे वातावरण आहे. या प्रकरणाचा पोलिसांनी सखोल तपास करून घटनेमागील सत्य उघड करावे आणि दोषींना शोधून कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

सातपूरमध्ये २ दुचाकींची समोरासमोर धडक, २ तरुणांचा मृत्यू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



नाशिक - शहरातील सातपूर औद्योगिक वसाहतीत मंगळवारी (दि. १७) सकाळी भीषण अपघाताची घटना घडली. महिंद्रा सोना कंपनीजवळ दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात एका तरुणाचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर दुसऱ्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या दुर्घटनेत दोघांना जीव गमवावा लागला आहे.

अपघातात राजेश भोये यांचा जागीच मृत्यू मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी सुमारे सात वाजेच्या सुमारास सातपूर औद्योगिक वसाहतीतील महिंद्रा सोना कंपनीजवळ दोन दुचाकींची समोरासमोर धडक झाली. धडक इतकी जोरदार होती की, या अपघातात राजेश कृष्णा भोये यांचा जागीच मृत्यू झाला. तर या अपघातात गंभीर जखमी झालेल्या धनंजय समाधान पगार (वय २१, रा. सातपूर) यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असताना त्यांचीही प्राणज्योत मालवली.

सातपूर पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची नोंद सातपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रकाश अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली सातपूर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करीत आहेत.

मोर्शीत मारहाणीची घटना : नशीदपूर फाट्याजवळ इसमाला मारहाण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

तक्रारदारावर अमरावतीच्या गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु

आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना

मोर्शी - मोर्शी पोलीस स्टेशनच्या हद्दीत एका व्यक्तीला जबरदस्तीने सोबत नेऊन मारहाण केल्याची घटना १६ नोव्हेंबर रोजी रात्री घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. रमाकांत नरेंद्र गावंडे (वय ३८, रा. प्रशांत कॉलनी, मोर्शी) यांनी याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे.

प्राप्त तक्रारीनुसार, काही व्यक्तींनी रमाकांत गावंडे यांना जबरदस्तीने सोबत नेले आणि नशीदपूर फाट्याजवळ त्यांना मारहाण केली. प्रथमदर्शनी त्यांना हाताबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याचे दिसून येत असून, घटनेतील इतर बाबींची पोलीस प्रशासनाकडून सखोल चौकशी करण्यात येत आहे. दरम्यान, मारहाणीत जखमी झालेल्या रमाकांत गावंडे यांच्यावर सध्या अमरावती येथील गॅलेक्सी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. प्राप्त तक्रारीच्या आधारे संबंधित व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच आरोपींचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेण्यासाठी पोलिसांची विविध पथके रवाना करण्यात आली आहेत. या प्रकरणाचा तपास पोलीस करीत असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, या घटनेबाबत नागरिकांनी कोणत्याही अप्रमाणित माहितीवर विश्वास ठेवू नये तसेच सोशल मीडिया, व्हॉट्सअॅप किंवा अन्य माध्यमांतून अफवा पसरवू नयेत, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



दुष्काळाचे संकट गडद : आणखी चार तालुक्यांत दुष्काळ घोषित, राज्यात अन्य तालुक्यांचेही ग्राऊंड सर्वेक्षण होणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – राज्यातील दुष्काळाचे संकट दिवसेंदिवस गडद होत असून राज्य सरकारने मंगळवारी आणखी चार तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित केला. त्यामुळे दुष्काळी तालुक्यांची संख्या आता ३०४ वरून ३०८ वर पोहचली आहे. याशिवाय आणखी काही तालुक्यांचे ग्राऊंड सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे दुष्काळी तालुक्यांच्या संख्येत वाढ होणार आहे.

महसूल मंत्री तथा दुष्काळी उपाययोजनांच्या संदर्भात गठित करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीत पाणीटंचाई निवारण, जलजीवन मिशनची अपूर्ण कामे आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाली. दुष्काळी परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून आवश्यक उपाययोजनांना गती देण्यासाठी पालक सचिवांनी अधिवेशनापूर्वी राज्यातील सर्व जिल्ह्यांना भेट देऊन दुष्काळाच्या सर्व निकषांनुसार परिस्थितीचा सविस्तर आढावा घेऊन त्याबाबतचा अहवाल मुख्य सचिवांकडे सादर करावा, असे निर्देश बावनकुळे यांनी बैठकीत दिले. दहा उपाययोजनांबाबत दोन दिवसांत निर्णय पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणाऱ्या दहा उपाययोजनांबाबत येत्या एक-दोन दिवसांत शासन निर्णय जारी करण्यात येणार आहे.

जलजीवन मिशनअंतर्गत योजना पूर्ण झाल्यास ज्या गावांमध्ये टँकरची आवश्यकता भासणार नाही, अशा १३ तालुक्यांतील २१२ योजनांच्या कामांसाठी वित्त विभागाने ८३.१८ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पाबाबत व्यापक जनसुनावणी आवश्यक : आ.सत्यजीत तांबे यांची मागणी


(प्रतिनीधी वरुड दर्पण)

लासलगाव – नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्पाचा सखोल तांत्रिक आणि व्यवहार्यतेचा अभ्यास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या डॉ. अनिल काकोडकर समितीची ६० दिवसांची मुदत संपली तरी अहवाल पूर्ण झालेला नाही. समितीची सुरू असलेली अभ्यास प्रक्रिया लक्षात घेता, या कामासाठी आणखी काही काळ देण्याची तयारी आमदार सत्यजित तांबे यांनी दर्शवली असून प्रकल्पाबाबत अंतिम निर्णय घेण्यापूर्वी बाधित शेतकरी आणि नागरिकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी व्यापक जनसुनावणी झालीच पाहिजे, अशी भूमिकाही आ.तांबे यांनी घेतली आहे. या प्रकल्पाशी संबंधित आंदोलनात समितीला मुदतवाढ देऊ नये आणि जनसुनावणी घ्यावी, अशा दोन प्रमुख मागण्या करण्यात आल्या होत्या.

गिट्टी खदानमधून ट्रक वाहतुकीचा वाहनधारकांना त्रास

दुचाकी व चारचाकी वाहनांचे टायर होताहेत खराब

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – लोणी ते पिंपळखुटा या मार्गावर पिंपळखुटा येथील गिट्टी खदानमधून होणाऱ्या ट्रक वाहतुकीमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गिट्टी पडून राहत आहे. रस्त्यावर विखुरलेल्या या गिट्टीमुळे वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. या मार्गावरून दररोज दुचाकी, चारचाकी तसेच इतर वाहनांची मोठ्या प्रमाणात ये-जा सुरु असते. मात्र, खदानमधून गिट्टीची वाहतूक करणाऱ्या ट्रकच्या अवजड वाहतुकीमुळे रस्त्यावर गिट्टी साचत असल्याने दुचाकी घसरून अपघात होण्याचा धोका वाढला आहे. तसेच चारचाकी व दुचाकी वाहनांचे टायर खराब होऊन वाहनधारकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे, रस्त्यावर पडलेली गिट्टी साफ करण्याची तसेच वाहतुकी दरम्यान गिट्टी रस्त्यावर पडणार नाही याची खबरदारी घेण्याची जबाबदारी संबंधितांनी घेणे आवश्यक आहे. मात्र, याकडे दुर्लक्ष होत असल्याने सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. संबंधित प्रशासनाने या गंभीर समस्येची तातडीने दखल घेऊन रस्त्यावरील गिट्टी हटवावी, ट्रक वाहतुकीवर नियंत्रण ठेवावे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी वाहनधारक व नागरिकांकडून होत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत.

सेंट्रल मेंटल असोसिएशनचा संशोधन आणि शैक्षणिक प्रकाशन विभागाकडून

प्रसिद्ध मनोविकास तज्ञ डॉ.शिवा पुंडकर यांच्या संशोधन पेपरची निवड

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – बालमानसशास्त्र आणि बालकांच्या मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात संशोधनात्मक योगदान देणारे अमरावती येथील प्रसिद्ध मनोविकास तज्ञ, संशोधक डॉ.शिवा पुंडकर यांच्या संशोधन पेपरची नवी दिल्ली येथील सेंट्रल मेंटल असोसिएशनचा संशोधन आणि शैक्षणिक प्रकाशन विभागाकडून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या यशामुळे अमरावतीच्या शैक्षणिक व मानसशास्त्रीय क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

डॉ.शिवा पुंडकर यांनी मुलांमधील वर्तनात्मक बदल या महत्त्वपूर्ण विषयावर संशोधन पेपर सादर केला होता. या संशोधनाची शैक्षणिक दखल घेत संस्थेकडून त्याची निवड व पुढील शैक्षणिक मान्यतेसाठी विचार करण्यात आला आहे. यासंदर्भात संस्थेने दिनांक १७ नोव्हेंबर २०२६ रोजी अधिकृत पत्राद्वारे त्यांना कळविले आहे. आजच्या बदलत्या सामाजिक, कौटुंबिक आणि शैक्षणिक वातावरणात मुलांच्या वर्तनामध्ये विविध बदल दिसून येत आहेत. मुलांमधील भावनिक अस्थिरता, चिडचिड, आक्रमकता, एकलकोंडेपणा, अभ्यासातील अनास्था, मोबाईलचा वाढता वापर तसेच सामाजिक वर्तनातील बदल यांचा बालकांच्या मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याच दृष्टिकोनातून डॉ.शिवा पुंडकर यांनी बालकांच्या वर्तनात्मक बदलांच्या विषयावर संशोधन केले आहे.

बालकांचे वर्तन समजून घेताना केवळ त्यांच्या कृतींकडे न पाहता त्यांच्या भावना, मानसिक गरजा, कौटुंबिक वातावरण आणि सामाजिक परिस्थिती यांचाही विचार होणे आवश्यक आहे. पालक, शिक्षक आणि समुपदेशक यांच्यासाठी हा संशोधन विषय महत्त्वपूर्ण ठरणारा आहे.

या यशाबद्दल डॉ.शिवा पुंडकर यांचे विविध शैक्षणिक, सामाजिक व मानसशास्त्रीय क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे. बालमानसशास्त्राच्या क्षेत्रात संशोधन, जनजागृती आणि समुपदेशनाच्या माध्यमातून योगदान देण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच कौतुकास्पद आहे.

बालकांचे वर्तन समजून घेणे म्हणजे त्यांच्या मनाचा आवाज समजून घेणे होय, या सकारात्मक दृष्टिकोनातून त्यांचे संशोधन बालकांच्या मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यास उपयुक्त ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

स्मृति दालनाचे लोकार्पण, नव्या वादाची चिन्हे : बाळासाहेबांबद्दल खरी निष्ठा, प्रेम असलेल्या व्यक्तीच्या हस्तेच लोकार्पण - उद्धव ठाकरे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या स्मृतिदालनाचे काम येत्या २३ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सांगितले. या दालनाचे लोकार्पण बाळासाहेबांबद्दल खरी निष्ठा, प्रेम आणि त्यांच्या विचारांची बांधिलकी असलेल्या व्यक्तीच्या हस्तेच केले जाईल. केवळ एखाद्या पदावर किंवा खुर्चीवर बसलेली व्यक्ती लोकार्पणासाठी योग्य ठरत नाही, असा टोलाही उद्धव ठाकरे यांनी लगावला. त्यामुळे स्मृतिदालनाच्या उद्घाटनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रित करण्याच्या राज्यातील भाजप नेत्यांच्या प्रयत्नांच्या पार्श्वभूमिवर नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हे दिसत आहेत.

अमित शहा हे थापाडेबाज अमित शहा हे थापाडेबाज गृहमंत्री आहेत. खोटे बोलण्याखेरीज त्यांनी दुसरे कोणतेही कर्तृत्व दाखवलेले नाही. अजित पवार हयात असताना त्यांच्यावर ७० हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले. आता त्यांच्याच पुतळ्याचे अनावरण करून त्यांची थोरवी गायली जात आहे. अमित शहांनी अजित पवारांच्या पुतळ्यासमोर नाक रगडून माफी मागावी, अशी जळजळीत टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मंगळवारी येथे केली.

शहांचे विधान म्हणजे ब्रह्मवाक्य नसून थापाड्याचे वाक्य आहे, असा टोलाही त्यांनी लगावला.

स्वयंचलित हवामान केंद्र परिसरातील झाडांची छाटणी करा

राजुरा बाजार महसूल मंडळातील शेतकऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



वरुड – तालुक्यातील राजुरा बाजार महसूल मंडळाच्या स्वयंचलित हवामान केंद्राच्या आजूबाजूच्या १०० मीटर परिसरात असलेल्या झाडांची योग्य छाटणी करून हवामान नोंदीमध्ये अडथळा निर्माण करणारी झाडे हटविण्यात यावीत, अशी मागणी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, वरुड तालुका हा संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून हजारो शेतकऱ्यांची उपजीविका संत्रा व मोसंबी फळिपकांवर अवलंबून आहे. येत्या १ डिसेंबरपासून आंबिया बहार संत्रा हंगाम सुरू होत आहे. या काळात हवामान आधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत स्वयंचलित हवामान केंद्रावर नोंदविल्या जाणाऱ्या तापमान, पाऊस व इतर हवामानविषयक आकडेवारीला विशेष महत्त्व आहे.

राजुरा बाजार येथील हवामान केंद्राच्या परिसरातील झाडांमुळे हवामान नोंदींवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन नियमानुसार अडथळा निर्माण करणाऱ्या झाडांची शास्त्रीय पद्धतीने छाटणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

मात्र, ही कार्यवाही करताना शेतकऱ्यांच्या संत्रा व मोसंबी फळबागांचे नुकसान होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. शेतकऱ्यांच्या संमतीने तसेच कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतच आवश्यक ती कार्यवाही करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

हवामान केंद्राच्या चुकीच्या किंवा अचूक नसलेल्या नोंदींमुळे भविष्यात संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना हवामान आधारित फळपीक विम्याची नुकसानभरपाई मिळताना अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे हवामान केंद्राची तांत्रिक तपासणी करुन १ डिसेंबरपूर्वी सर्व आवश्यक कामे पूर्ण करावीत, अशी मागणी अंकुश बोडनासे व हर्षल बोहुरुपी यांच्यासह राजुरा बाजार महसूल मंडळातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे.

पोलिस पाटील यांच्या प्रलंबित मागण्या विधानसभेत मांडा

राज्य पोलीस पाटील श्रमिक संघटनेचे आमदार उमेश यावलकर यांना साकडे

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



वरुड – पोलिस पाटील यांच्या प्रलंबित मागण्या विधानसभेत मांडा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील श्रमिक संघटनेच्या वतीने आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांचेकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील श्रमिक संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, राज्यातील पोलीस पाटील हे ग्रामीण भागातील गाव पातळीवर पोलीस प्रशासनाचा अत्यंत महत्त्वाचा घटक असून गाव पातळीवर कायदा सुव्यवस्था राखणे, गुन्हेगारी घटकाची माहिती देणे, सामाजिक सलोखा राखणे तसेच पोलीस प्रशासनास आणि नागरिक यांचे मध्ये समन्वय साधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत असते पोलीस पाटील अत्यंत जबाबदारीने व प्रामाणिकपणे सेवा बजावत असताना त्यांच्या अनेक न्याय मागण्या शासन दरबारी अद्याप प्रलंबित आहेत.

वारंवार निवेदन देऊन सुद्धा आमचे मागण्या बाबत अपेक्षित निर्णय झालेले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील श्रमिक संघटनेच्या वतीने आपणांस विनंती करण्यात येते की, येत्या हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित करून संबंधित विभागाच्या मंत्र्यांकडून सभागृहात स्पष्ट उत्तर घ्यावे.

पोलीस पाटलांची वयोमर्यादा ६० वर्षा वरुन ६५ वर्ष करावे, पोलीस पाटलांचे मानधन १५ हजार रुपये वरुन ३० हजार रुपये करावे, महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील अधिनियम १९६७ मध्ये आवश्यक ते सुधारणा करून पोलीस पाटलांना अधिक संरक्षण व सेवा विषय सुविधा देण्यात याव्या, पोलीस पाटलांचे २०१२ पासून प्रलंबित दैनिक व प्रवास भत्ता अद्याप मिळालेला नाही तो अदा करण्यात यावा, राज्यातील पोलीस पाटलांच्या रिक्त जागा तातडीने भरण्यात यावे, दर पाच वर्षांनी होणारे नुतनीकरण कायम स्वरुपी बंद करण्यात यावे, पोलीस पाटील कर्तव्य बजावत असताना किंवा सेवानिवृत झाल्यास त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाह करिता २० लाख रुपये देण्यात यावे, या मागण्या विधानसभेत उचलुन आम्हाला न्याय मिळवुन द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील श्रमिक संघटनेच्या वतीने राज्य सचिव हरिदास घोरपडे, जिल्हाध्यक्ष प्रकाश वानखडे पाटील, भुषण गोहत्रे पाटील, रुपेश उईके पाटील, रामदास गावंडे पाटील यांचेसह इतरांनी केली आहे.

संपादकीय


शांत राहणे ही कमजोरी नसून योग्य वेळेची वाट पाहण्याची ताकद आहे.

सत्तेच्या राजकारणात जनतेच्या प्रश्नांना बगल नको!

अमित शाह यांच्यावर उद्धव ठाकरेंची टीका; मणिपूर आणि अरुणाचल प्रदेशच्या परिस्थितीवरून केंद्र सरकारच्या जबाबदारीचा मुद्दा ऐरणीवर लोकशाही व्यवस्थेत सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे हा विरोधकांचा अधिकारच नव्हे, तर लोकशाहीच्या जिवंतपणाचा महत्त्वाचा आधार आहे. सत्तेच्या सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तींनी आपल्या कामाचा हिशेब जनतेला देणे अपेक्षित असते. मात्र, देशाच्या राजकारणात सध्या विकासाच्या आणि जनतेच्या मूलभूत प्रश्नांपेक्षा आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणालाच अधिक महत्त्व मिळत असल्याचे चित्र दिसत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यातील अलीकडील शाब्दिक संघर्षाने पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले आहे. पुण्यातील एका कार्यक्रमात अमित शाह यांनी कोरोना काळातील महाराष्ट्राच्या तत्कालीन प्रशासनाबाबत आणि उद्धव ठाकरे यांच्या कार्यपद्धतीबाबत काही विधाने केली. या विधानांना प्रत्युत्तर देताना उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली. त्यांनी शाह यांचा उल्लेख 'चकाट्या पिटणारा गृहमंत्री' असा करत मणिपूर आणि अरुणाचल प्रदेशातील परिस्थितीकडे लक्ष वेधले. मणिपूरमध्ये जाऊन तेथील परिस्थितीचा आढावा घ्यावा, तसेच अरुणाचल प्रदेशातील नागरिकांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यावे, असे आव्हानही त्यांनी दिले. या विधानांमुळे राजकीय वतुर्ळात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे. मुळात मणिपूरचा प्रश्न हा केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा विषय नाही. तेथील सामाजिक शांतता, नागरिकांची सुरक्षितता, विस्कळीत झालेले जनजीवन आणि विविध समुदायांमधील विश्वासाचे वातावरण पुन्हा निर्माण करणे ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या कार्यक्षेत्रात अंतर्गत सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेशी संबंधित अनेक महत्त्वाचे विषय येतात. त्यामुळे अशा संवेदनशील परिस्थितीत केंद्र सरकारने कोणती पावले उचलली, त्यांचे परिणाम काय झाले आणि सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी आणखी काय केले जाणार आहे, याबाबत जनतेला स्पष्ट माहिती मिळणे आवश्यक आहे. अरुणाचल प्रदेशच्या संदर्भातही राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न महत्त्वाचा आहे. चीनसोबतच्या सीमावादाच्या पार्श्वभूमीवर सीमावर्ती भागातील नागरिकांचे प्रश्न, पायाभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था आणि स्थानिक जनतेचा विश्वास या बाबींना प्राधान्य देणे गरजेचे आहे. सैनिकांचे मनोबल आणि सीमावर्ती नागरिकांचे हित यांचा विचार करून केंद्र सरकारने जबाबदारीने काम करणे अपेक्षित आहे. उद्धव ठाकरे यांनी याच मुद्द्यांवरून अमित शाह यांना लक्ष्य केले आहे. अर्थात, अशा आरोपांची सत्यता आणि संबंधित परिस्थितीचे मूल्यमापन अधिकृत माहितीच्या आधारे होणेही तितकेच आवश्यक आहे.



एकाच दिवशी समर्थ आडकुजी महाराजांची २०५ वी जयंती व १०५ वा पुण्यतिथी महोत्सव





''स्वर्गात दिपक लागती, ती आज कार्तिक पौर्णिमा, त्रिपुरी पुराणीं बोलती, बघ चंद्रमा दिन पौर्णिमा, गुरू आडकुजी जन्म घे आणि घे समाधी या दिना, स्मर प्रार्थना दिन पौर्णिमा, कर सामुदायिक प्रार्थना!!'' अशा प्रकारचा दिव्य स्वरूपाची जाणीव करुन देणारा संदेश परमहंस श्री समर्थ सद्गुरु आडकुजी महाराजांचे शिष्य प्रवर युगप्रवर्तक महाकवी राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी लिहून ठेवलां. त्या समर्थाचा अवतार दिन व समाधी दिन याच कार्तिक महिन्यातील कार्तिक त्रिपुरारी पौर्णिमेचा त्यात वरखेडचे परमहंस श्रीसमर्थ सद्गुरु आडकुजी महाराज, शेगावचे गजानन महाराज, शिर्डीचे साईबाबा, साईखेडाचे दादाजी धुनिवाले, नागपूरचे ताजुदिन महाराज, धामणगावचे मुंगसाजी महाराज, जोडमोहा खटेश्वर महाराज, तसेच संतभूमीआर्वीच्या मायबाई या समकालीन संत माऊली संत ज्ञानेश्वर महाराजांची परंपरा विदर्भातील आर्वी पर्यंत पोहोचली आणि या सर्वांमध्ये वयाने व अधिकाराने जेष्ठ असलेल्या परमहंस तिथीला पोहचलेल्या समर्थाचा मंगळवारी बारा वाजता १४ नोव्हेंबर १८२१ ला मायबाई वार्डातील कासार कुळातील कासाबाई फिसके यांच्या उदरी कार्तिक त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी परमहंस श्रीसमर्थ सद्गुरू आडकुजी महाराजांचा जन्म झाला.बालपण आर्वी परिसरात जात असतानाच घरातील लोकांना चिंता वाटू लागली आणि ''वय अठरा लग्न होऊनी,नग्न जाहले,ही ग्वाही देती पुरातन भले! 'प्रत्येक कुटुंबातील रितीरिवाजा वयाच्या अठरा वर्षी लग्न झाले आणि त्याच रात्री आपल्या जीवनाला वेगळीच कलाटणी दिली. आपलं घर पेटवून संसाराला कायमचाच रामराम ठोकून जीवन साधनेत, अलमस्त नग्न अवस्थेत फिरतांना संत भूमी आर्वीत अनेक साक्षात्कार घडले.आणि मग दहेगाव मुस्तफा आणि आजुबाजुच्या परिसरातील अनेक ठिकाणी निसर्गाच्या सान्निध्यात राहून अनेक ठिकाणी स्वानुभव प्राप्त केले, दहेगाव मुस्तफा येथे मुस्लिम समाजातील मुस्तफा खॉ साहेबांच्या घरातील एक सदस्य म्हणून साधारण पंचवीस, तीस वर्षांचा कालावधी लोटला, खॉ साहेबांच्या वजीरा बेगम व नुर बेगम या व्दय भार्यानीं त्यांची निर्विकल्पपणे सेवा केली.त्याच काळात अनेक ठिकाणी परिभ्रमण सुध्दा केले. रामटेक येथे जाऊन ज्या ठिकाणी प्रभू रामचंद्रांचा चरण स्पर्श झाला, त्या रामटेकच्या प्रभु श्रीरामाच्या सानिध्यात एक रात्र राहून अनेक साक्षात्कार सोबतच्या लोकांना घडले. हे सर्व झाल्यावर वयाच्या चौसष्टव्या वर्षी परमधाम श्रीक्षेत्र वरखेडची वाट धरली,''वय चौसष्ट वर्षांचे!आले वरखेडी साचे!'' ही राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांची साक्ष तो काळ इ.स.१८८४-८५ चा असेल तेंव्हापासून परमहंस श्रीसमर्थ सद्गुरु आडकुजी महाराज वरखेडला राहायला लागले, वरखेड करांना त्यांचे अनेक सुखद अनुभव आले. अनेकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आले, वरखेड करांनी त्यांची अहोरात्र सेवा केली, ते येण्याचे कारण मात्र एकच जगाच्या इतिहासात नवचैतन्य निर्माण करणारे बाल माणिक घडवायचे होते. ज्याप्रमाणे स्वामी रामकृष्ण परमहंसानीं कलकत्त्याच्या भूमीत एका ठिकाणी बसून स्वामी विवेकानंदाला घडविले आणि त्यांनी शिगागोची धर्म परिषद गाजवली. त्याच प्रमाणे परमहंस श्रीसमर्थ सद्गुरु आडकुजी महाराजांनी माणिक नावाच्या जीवन जागृती करणाऱ्या शिल्पाला आकार देऊन तेरा वर्षांच्या बाल माणिक अर्थात राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांना विश्वाकार, विश्वमय व विश्वव्यापी बनविले. त्या महाकवीनारायण राष्ट्रसंतानी आपल्या सद्गुरु आडकुजी महाराजांवर शेकडो भजने लिहून गाईली तसेच 'श्रीमत आडकुजी पदा भजमना, मग जन्म नाही कदा, हे सद्गुरु स्तुत्याष्टक, आरती आदि बनवून प्रत्येक सेवा कार्य ''श्री गुरूदेव'' नांवानें समर्पित केले. त्या सद्गुरु आडकुजी महाराजांचे जीवन चरित्र 'राष्ट्रसंताचे-गुरूदेव' नावाने लिहीण्याचे अहोभाग्य राष्ट्रसंतामुळे संतचरित्रकार श्री रामकृष्णदादा बेलूरकर, आद्यग्रामगीताचार्य यांना लाभले. राष्ट्रसंताचे गुरूदेव, परमहंस श्रीसमर्थ सद्गुरु आडकुजी महाराज चरित्रामृत, श्री गुरूदेव गीतांजली, सदगुरु स्तुत्याष्टक, व्दिशताब्दी सद्गुरुची अशा प्रकारचे पाच, सहा ग्रंथ आणि पोथी लेखन आणि संपादन करण्याचें अहोभाग्य लाभले.त्यांच्या लाखों प्रती जनमानसात पोहोचविले. ज्या भक्तांना अनुभूती झाली. तेच लोक दर गुरुवारी आणि पौर्णिमेला वरखेड येथे दर्शनासाठी येतात. त्या परमहंस श्री समर्थ सद्गुरु आडकुजी महाराज यांनी १४ नोव्हेंबर १९२१ ला बारा वाजता कार्तिक त्रिपुरारी पौर्णिमेच्या दिवशी संजिवनी समाधी घेतली. त्या सद्गुरु आडकुजी महाराजांच्या विषयी महाकवी राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज लिहतात ''श्री गुरू आडकुजी चरणांने, किती तरी तरले, पूढे ही तरतील, कलियुगे हाची धर्म, तरेल तो पदिची धुळीच लावील'' त्या परमहंस श्रीसमर्थ सद्गुरु आडकुजी महाराज यांचा २०५जयंती दिन अवतार दिन तसेच १०५ पुण्यतिथी महोत्सव, संजिवनी समाधी दिन सोहळा तिथीनुसार तिर्थस्थापना गेल्या १७ नोव्हेंबर २०२६ रोजी वरखेड येथे पार पडली.



माणिकदास बेलूरकर
संत साहित्य अभ्यासक श्रीक्षेत्र वरखेड ता.तिवसा जि.अमरावती
भ्रमणध्वनी ९४२००७६५७३

अण्णा आणि देश दोघांनाही चकवा लागला?



जोपर्यंत स्वतंत्र, सक्षम आणि सत्ताधाऱ्यांवर कारवाई करू शकणारा लोकपाल उभा राहत नाही, तोपर्यंत अण्णांचं आंदोलन अपूर्ण आहे आणि त्याचा हिशेब देणं सगळ्यांच्या डोक्यावर आहे.

सोनिया गांधी यांच्या पुस्तकाचं प्रकाशन १० नोव्हेंबरला झालं आणि त्यातील अण्णा हजारे यांच्या आंदोलनाचे प्रसंग चर्चेत आले. या वृत्तांनुसार, लोकपालासाठी झालेल्या आंदोलनामुळे तत्कालीन यूपीए सरकारवर राजकीय दबाव आला होता.

आंदोलन मिटावं म्हणून केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांना शिष्टाई करावी लागली, असाही उल्लेख त्यात आहे. एका अर्थाने हा काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्याचा दीर्घ विलंबाने दिलेला कबुलीजबाब आहे. आंदोलन किती प्रभावी होतं, हे सत्तेतल्या माणसाने मान्य केलं. पण सोनियाजींच्या पुस्तकातून अर्धवट स्मरण झालं आहे. २०११-१२ मध्ये आंदोलकांवर संघ-भाजपचे एजंट असल्याचे आरोप करणारे दिग्विजय सिंह, कपिल सिब्बल आणि मनीष तिवारी हे त्यांचेच सहकारी होते. आता दबाव आला होता असं सांगताना त्या दबावाला सरकारने कसा प्रतिसाद दिला, हेही त्यांनी प्रामाणिकपणे सांगायला हवं होतं.

अण्णांचा खुलासा

अण्णा हजारे यांनी हा आरोप फेटाळून लावला आहे. त्यांचा खुलासा सोनियाजींच्या दाव्याइतकाच तपासायला हवा. अण्णा स्वतःला निमर्ळ ठेवू शकतात, पण निमर्ळपणा हा इतिहासाचा पुरावा नसतो. आंदोलन कोणाच्या सोयीचं ठरलं, त्यातून सत्ता कोणाकडे गेली आणि मागण्यांचं पुढे काय झालं, यावरून त्याचं मूल्यमापन होतं. अण्णांच्या खुलाशाने काँग्रेसचा दावा खोडला जातो, पण आंदोलनाच्या राजकीय परिणामांचं उत्तर मिळत नाही.

लोकपाल : कायदा झाला, संस्था उभी राहिली नाही

लोकपाल आणि लोकायुक्त अधिनियम, २०१३ डिसेंबर २०१३ मध्ये संसदेत मंजूर झाला आणि १ जानेवारी २०१४ ला राष्ट्रपतींची मान्यता मिळाली. त्यानंतर पाच वर्षं लोकपालाची नियुक्ती झाली नाही. विरोधी पक्षनेत्याच्या तांत्रिक अडचणीचं कारण पुढे केलं गेलं. सर्वोच्च न्यायालयाने कॉमन कॉज विरुद्ध भारत सरकार प्रकरणात वारंवार कानउघाडणी केली, तेव्हा मार्च २०१९ मध्ये न्या. पिनाकी चंद्र घोष पहिले लोकपाल झाले. त्यातही २०१६ च्या दुरुस्तीने कलम ४४ मधील मालमत्ता-घोषणेची अट सैल केली गेली. कलम ६३ नुसार राज्यांनी एका वर्षात लोकायुक्त नेमायचे होते. महाराष्ट्राला त्यासाठी २०२२ पर्यंत थांबावं लागलं. लोकपालाला स्वतःची स्वतंत्र तपास यंत्रणा नाही, तो सीबीआयवर अवलंबून आहे. त्याच सीबीआयला न्या. आर. एम. लोढा यांच्या खंडपीठाने २०१३ मध्ये 'पिंजऱ्यातला पोपट' म्हटलं होतं. पोपटावर विसंबून वाघ पकडायला निघाल्यासारखी ही रचना होती.

संघ-भाजपची रसद आणि आंदोलनाचा लाभार्थी

अण्णांच्या मागे संघ-भाजपची ताकद होती का, या प्रश्नाचं उत्तर पूर्ण होकारात किंवा पूर्ण नकारात देता येत नाही. अण्णा स्वतः भाजपचे हस्तक नव्हते. पण आंदोलनाची गर्दी, स्वयंसेवक आणि संघटनात्मक रसद यात संघपरिवाराशी जोडलेल्या लोकांचा वाटा मोठा होता. गोविंदाचार्य, रामदेवबाबा आणि पुढे भाजपमध्ये गेलेले जनरल व्ही. के. सिंग व किरण बेदी हे आंदोलनाच्या आतल्या वतुर्ळात होते. मग २०१४ चा लाभार्थी कोण ठरला, हा प्रश्न तटस्थपणे विचारला तर उत्तर स्पष्ट आहे. हेतू कितीही शुद्ध असला तरी राजकारणात फल पाहिलं जातं, हेतू नाही.

माध्यमांचा उत्सव

वृत्तवाहिन्यांनी अण्णांना डोक्यावर घेतलं, याची कारणं राजकीय आणि व्यावसायिक होती. चोवीस तास चालणाऱ्या वाहिन्यांना रोज नवं नाट्य हवं होतं, आणि धोतर-टोपीतला गांधीवादी, तिरंगा आणि घोषणांचा गजर हे तयार पॅकेज होतं. यूपीए सरकार २जी, राष्ट्रकुल, आदर्श आणि कोळसा घोटाळ्यांनी घेरलेलं होतं. त्यामुळे सरकारविरोधी भूमिका सोयीची आणि सुरक्षित होती. विडंबन असं की ज्या २जी प्रकरणाची आकडेवारी माध्यमांनी (कॅगच्या विनोद राय यांच्या १.७६ लाख कोटींच्या 'संभाव्य नुकसानी'वर) गाजवली, त्यात डिसेंबर २०१७ मध्ये विशेष सीबीआय न्यायालयाचे न्या. ओ. पी. सैनी यांनी सर्व आरोपींना निर्दोष सोडलं. त्या निकालाला मिळालेली प्रसिद्धी आंदोलनाच्या प्रसिद्धीच्या एक दशांशही नव्हती.

अण्णा गायब झाले, की गायब केले गेले?

नोव्हेंबर २०१२ मध्ये अरविंद केजरीवाल यांनी 'आप' काढला आणि अण्णा त्यांच्यापासून वेगळे झाले. त्यांनी राजकारणात उतरायला विरोध केला, पण चळवळीच्या राजकीय परिणामांचा विचार त्यांनी केला नाही. २०१४ नंतर २०१८ मध्ये रामलीला मैदानावर उपोषण झालं आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लेखी आश्वासनानंतर ते सुटलं. २०१९ मध्ये राळेगणसिद्धीत पुन्हा तेच झालं. आश्वासनं मिळाली, पाळली गेली नाहीत. नोटाबंदी, इलेक्टोरल बॉंड्स, सीबीआय-ईडीचा विरोधकांविरुद्ध वापर या काळात अण्णा जवळपास मौन होते. इलेक्टोरल बॉंड योजना फेब्रुवारी २०२४ मध्ये असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स विरुद्ध भारत सरकार या निकालात सर्वोच्च न्यायालयाने असंवैधानिक ठरवली. ज्या भ्रष्टाचाराविरुद्ध अण्णा रस्त्यावर उतरले होते, त्याला कायदेशीर कवच देणारी ती योजना होती. तिच्यावर त्यांचं आंदोलन आठवत नाही.

कंगनांचा ट्विट कट!!

अभिनेत्री आणि खासदार कंगना रणौत यांनी सोनिया गांधींबाबत एक पोस्ट लिहून काही प्रश्न उपस्थित केले. परदेशी स्त्रीच्या येण्याने गांधी कुटुंबात एकापाठोपाठ एक मृत्यू कसे झाले? हा प्रश्नही त्यांनी विचारला आहे. एक खासदार संशयाचं हे असं गाठोडं पुराव्याशिवाय समाजमाध्यमांवर का फेकतात? त्यांच्या हेतूचा पुरावा माझ्याकडे नाही, म्हणून मी तो ठरवणार नाही. पण प्रश्न स्वाभाविक आहे: निवडक योगायोग जोडून, खटले आणि आयोगांचे निकाल गाळून लिहिलेली ही पोस्ट कोणाला खूष करण्यासाठी आहे? वाचकांसाठी, की राजकीय बॉससाठी? उत्तर त्यांनी द्यावं. सोनिया १९६८ मध्ये गांधी कुटुंबात आल्या. संजय गांधींचा मृत्यू १९८० मध्ये, म्हणजे बारा वर्षांनी, विमान अपघातात झाला.

इंदिराजींची हत्या १९८४ मध्ये त्यांच्याच अंगरक्षकांनी केली. राजीव गांधींचा बळी १९९१ मध्ये एलटीटीईच्या आत्मघातकी हल्ल्यात गेला आणि सर्वोच्च न्यायालयाने राज्य विरुद्ध नलिनी (१९९९) मध्ये दोषींची शिक्षा कायम ठेवली. यात 'रहस्यमय परदेशी' कुठे बसते? तेवीस वर्षं चालणारं कारस्थान रचणारी व्यक्ती स्वतः विधवा होते, हे कथानक बॉलिवूडलाही पटणार नाही. 'उरलेली एकच उमेदवार' हेही तथ्यांशी जुळत नाही.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२



वरुड : सेवानिवृत्त प्राचार्य रमेशराव झोटींग यांच्या ७५ व्या वाढदिवस निमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना प्रसिध्द वैद्यकीय तज्ञ डॉ.अमोल देशमुख, दंतरोग तज्ञ डॉ.आनंद झामडे तथा प्रसिध्द अस्थिरोग तज्ञ डॉ.निलेश झोटींग.




वरुड : माजी जि.प.सभापती तथा कॉंग्रेसचे नेते गिरीश कराळे यांच्या वाढदिवसानिमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना अनिल कनाटे, आशिष शेळके, जुबेर शाह, चेतन देवते, संजय वानखडे व इतर.



वरुड : माजी जि.प.सभापती तथा कॉंग्रेसचे नेते गिरीश कराळे यांच्या वाढदिवसानिमित्ताने पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना डॉ.मनोज उमेकर, टेंभुरखेडाचे माजी उपसरपंच राजेंद्र सोनुले व इतर.

विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन पुस्तिका : पुस्तिकेसाठी २० कोटींचा खर्च

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींबाबत शालेय विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, या हेतूने राज्यातील इयत्ता सातवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन विषयक पुस्तिका प्रायोगिक तत्वावर उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यासाठी २० कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. मदत आणि पुनर्वसन विभागाने मंगळवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. गेल्या काही वर्षांत जागतिक हवामान बदल, पर्यावरणीय बदल आणि औद्योगिकीकरणामुळे नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तींची वारंवारता आणि तीव्रता वाढली आहे. या आपत्तींचा वैयक्तिक तसेच सामाजिक जीवनावर विपरीत परिणाम होत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये लहान वयापासूनच आपत्ती व्यवस्थापनाची जाणीव निर्माण करण्याचा सरकारचा उद्देश आहे. या पुस्तिकेत महत्त्वाच्या नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

तापमान

	कमाल	किमान
अमरावती	२९	२४
यवतमाळ	२८	२१
अकोला	२७	२४
वाशिम	२८	२३
बुलढाण	२७	२२
वर्धा	३०	२३
नागपूर	२९	२४
चंद्रपुर	२९	२५
गडचिरोली	२८	२३

अखेर शेतकऱ्यांच्या शेतात जाणारी वहिवाटीची वाट झाली मोकळी!

महसूल विभाग व पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत दहा फूट रुंदीचा रस्ता खुला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





मोर्शी – मोर्शी तालुक्यातील मौजा खेड भाग क्रमांक एक येथील शेतकऱ्यांच्या शेतात जाणारा वहिवाटीचा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून वादाच्या भोवऱ्यात अडकला होता. या रस्त्याच्या वादामुळे शेतकऱ्यांना शेतीची कामे करण्यासाठी ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत हा रस्ता मोकळा करून देण्यात आल्याने संबंधित शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

या प्रकरणात तरोडा येथील शेतकरी विनोद शामराव अढावू यांनी जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले होते. प्रतिवादी शेतकरी मोहन उज्जैनकर यांना शेतात जाण्यासाठी दुसरा कोणताही रस्ता उपलब्ध नसल्याने त्यांनी वहिवाटीच्या रस्त्याची मागणी केली होती. त्यानुसार रस्ता उपलब्ध झाल्यानंतर काही दिवसांनी पुन्हा त्या रस्त्यावर अतिक्रमण करून तो बंद करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. महसूल विभागाने अनेकदा रस्ता मोकळा करण्याचे प्रयत्न केले; मात्र त्याला यश आले नाही. परिणामी, शेतात जाण्याचा मार्ग बंद झाल्याने मोहन उज्जैनकर यांना शेतीची वहिवाट करणे कठीण झाले होते. अखेर दिवाणी न्यायालयाचा आदेश कायम ठेवत तहसीलदार मोर्शी तसेच उपविभागीय अधिकारी मोर्शी यांनी दिनांक ४ फेब्रुवारी २०२० आणि २४ जून २०२१ रोजी मंजूर केलेल्या रस्त्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली. वादीच्या शेताच्या मधून नवीन रस्ता तयार करून ये-जा करू नये, अशी ताकीद देण्यात आली. तसेच वादी शेतकऱ्याच्या धुऱ्याने खेड-तरोडा सीमेवरून दहा फूट रुंदीचा बैलबंडी जाण्यायोग्य रस्ता महसूल विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत मोकळा करून देण्यात आला.

अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या वादावर अखेर तोडगा निघाल्याने संबंधित शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी मार्ग उपलब्ध झाला आहे.

मुसळखेडा हनुमान पेठच्या श्री संत सदगुरु योगीराज महाराज यांची

प्रथम पुण्यतिथी व विश्वशांती अखंड हरिनाम सप्ताह : दिंडीत अनेकांचा सहभाग

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



चांदस वाठोडा – येथुन जवळच असलेल्या मुसळखेडा हनुमान पेठ येथील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान श्री संत सदगुरु योगीराज महाराज यांच्या प्रथम पुण्यतिथी महोत्सव व विश्वशांती अखंड हरिनाम सप्ताहाला येत्या १५ नोव्हेंबर पासुन सुरुवात झाली आहे. या कार्यक्रमांतर्गत गोकुलधाम येथील ह.भ.प.वैभवश्री जी यांचे श्रीमद भागवत कथा प्रवचन सुध्दा सुरु असून भाविकांचा प्रचंड प्रतिसाद लाभत आहे.


१५ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता शोभायात्रा व ग्रंथदिंडी श्री संत सदगुरु योगीराज महाराज देवस्थान येथुन श्रींच्या चरण पादुकांसह काढून व सकाळी ९ वाजता पताका, पुजन, विना पुजन, कलश पुजन डॉ.भुषण खोले व डॉ.शुभांगी खोले यांचे हस्ते करण्यात आले. श्री सदगुरु योगीराज माऊली यांच्या चरण पादुका रामभाऊ देशमुख चांदस यांच्या निवासस्थानावरुन श्री सदगुरु योगीराज माऊली आश्रम हनुमान पेठ येथे आणण्यात आल्या होत्या. या शोभायात्रा व ग्रंथदिंडीमध्ये यशवंत महिला मंडळ वाठोडा, जय भवानी दुर्गा महिला भजन मंडळ, मॉ नर्मदा भजन मंडळ, माऊली महिला भजन मंडळ, गुरुदेव महिला सेवा मंडळ, जनाई महिला भजन मंडळ, श्री दादाजी भक्त भजन मंडळ, ग्रामपंचायत चांदस व वाठोडा, मुसळखेडा व समस्त ग्रामवासी मोठया संख्येने सहभागी झाले होते. १५ नोव्हेंबर रोजी सदगुरु श्री योगीराज बाबा देवस्थान येथून बाबांच्या पालखी दिंड्या सहित प्रस्थान चांदस वाठोडा येथे विठ्ठल मंदिर येथे पोहोचले. सर्व भाविक भक्तांनी रामकृष्ण हरी च्या गजरात पालखीचा आनंद घेतला. संपूर्ण चांदस वाठोडा परिसरातून दिंड्या पालख्या दिंडीचे स्वागत दोन्ही गावांमध्ये करण्यात आली. डिजे साऊंड सिस्टिम मध्ये व ठिकठिकाणी फटाके फोडून जंगी स्वागत करण्यात आले. कथा प्रवक्ता ह.भ.प.वैभवी श्रीजी गोकुलधाम यांच्या अमृतुल्य वाणीतुन सुरुवात झाली.

या सप्ताहांतर्गत विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून त्या अंतर्गत दैनंदिन कार्यक्रमांतर्गत पहाटे ५ ते ६ काकडा आरती, सकाळी ७ वाजता गाथा पारायण, दुपारी ११ वाजता भजन, दररोज दुपारी १ ते ५ गोकुलधाम येथील ह.भ.प.वैभवश्री जी यांचे श्रीमद भागवत कथा प्रवचन, सायंकाळी ५ वाजता हरिपाठ, रात्री ६ वाजता हरिकिर्तन, राष्ट्रवंदना, रात्री ८ वाजता संतभोजन आणि रात्री ९ वाजता हरी जागर सुरु आहे. १५ ते १८ नोव्हेंबर दरम्यान दररोज रात्री ६ वाजता अनुक्रमे अश्विनी गुडधे मुसळखेडा यांच्या सौजन्याने ह.भ.प.मंगेश महाराज गावंडे वाठोडा (आळंदीकर), सुमित्रा प्रदीप अकर्ते यांच्या सौजन्याने ह.भ.प.रमेश महाराज दुधे (यवतमाळ), स्व.शेषरावजी गोडबोले यांच्या स्मृति प्रित्यर्थ नरेश गोडबोले यांच्या सौजन्याने ह.भ.प.सुमित महाराज मेश्राम (अमरावती) यांचे किर्तन पार पडले.

येत्या रविवारी २२ नोव्हेंबरला सकाळी ११ वाजता डॉ.भुषण खोले व डॉ.शुभांगी खोले यांचे वतीने महाराष्ट्रातील सुप्रसिध्द किर्तनकार ह.भ.प.विशाल महाराज खोले यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्यानंतर दुपारी २ वाजता काला व महाप्रसाद वितरीत केल्या जाणार आहे. हरिपाठ, किर्तन, साथसंगत ह.भ.प.राजु महाराज अढाऊ, ह.भ.प.नितीन महाराज मेने, ह.भ.प.विपीन महाराज महल्ले, ह.भ.प.निकेश महाराज सावनकर, ह.भ.प.कौशल महाराज महल्ले, ह.भ.प.दिनेश काकडे, ह.भ.प.निलेश परतेती, प्रणय सावनकर व संचाची लाभणार आहे. या श्री संत सदगुरु योगीराज महाराज यांच्या प्रथम पुण्यतिथी महोत्सव व उर्वरीत विश्वशांती अखंड हरिनाम सप्ताहाला भाविकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री संत सदगुरु योगीराज महाराज देवस्थानच्या वतीने एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

बंगालच्या उपसागरात तिसरे वादळ : ताशी १२० ते १४५ किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



पुणे – बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचे वादळात रूपांतर झाले असून, येत्या दोन दिवसांत या वादळाची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तविली आहे. हे वादळ २० नोव्हेंबरच्या रात्री आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर धडकण्याचा अंदाज असून, यावेळी ताशी १२० ते १४५ किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. गेल्या महिनाभरात बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले आणि आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीच्या दिशेने सरकणारे हे तिसरे वादळ आहे. दक्षिण-पश्चिम मध्य बंगालच्या उपसागरात निर्माण झालेले 'अकवान' वादळ ताशी तीन किलोमीटर वेगाने उत्तर-उत्तर-पश्चिम दिशेने भारतीय भूभागाच्या दिशेने सरकत आहे. मंगळवारी हे वादळ चेन्नईच्या पूर्वेला समुद्रात सुमारे ६०० किलोमीटर अंतरावर होते. तसेच आंध्र प्रदेशातील मछलीपट्टणम आणि विशाखापट्टणमच्या दक्षिण-पूर्वेला ६५० किलोमीटर, तर ओदिशातील गोपाळपूरपासून सुमारे ७४० किलोमीटर अंतरावर त्याचे केंद्र होते.

बदलीच्या ठिकाणी रुजू व्हा अन्यथा थेट शिस्तभंगाची कारवाईचा बडगा!

शिक्षकांच्या बदलीबाबत राज्य सरकारचा मोठा निर्णय; ग्रामविकास विभागाच्या आदेशाने खळबळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदलीबाबत राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. शिक्षकांना बदलीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक करण्यात आले आहे. शिवाय शिक्षकांच्या बदलीबाबत ग्रामविकास विभागाने कडक पवित्रा घेतला असून बदलीनंतर रुजू न होणाऱ्या शिक्षकांवर थेट कारवाईचा बडगा उगारण्यात येणार आहे. इतकेच नव्हे तर शिक्षकांना बदलीविरोधात तक्रार करायची असल्यास अगोदर नवीन बदलीच्या ठिकाणी रुजू व्हावे लागणार आहे. दरम्यान, बदलीच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतरच शिक्षकांच्या तक्रारींचा विचार होणार, तसेच बदली आदेशाला स्थगिती नसतानाही नवीन ठिकाणी रुजू न होणाऱ्या शिक्षकांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

कुडाळमध्ये भरदिवसा बँक लुटण्याचा प्रयत्न फसला; संशयिताला पकडले; महिला कर्मचाऱ्याला चाकूचा धाक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



कुडाळ – कुडाळ शहरातील पानबाजार परिसरातील स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत मंगळवारी दुपारी भरदिवसा दरोडा टाकण्याचा प्रयत्न झाला. महिला कॅशियरला चाकूचा धाक दाखवून लाखो रुपयांची रोकड लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या भक्तराज वासुदेव सडवेलकर (२८) याला बँक कर्मचारी आणि नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. मंगळवारी दुपारी पावणेतीनच्या सुमारास चेहऱ्यावर मास्क लावून बँकेत शिरलेल्या संशयिताने महिला कॅशियरला चाकूचा धाक दाखवत रोकड ताब्यात घेतली. मात्र, तेथून पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना कर्मचारी आणि नागरिकांनी प्रसंगावधान राखत त्याला पकडले. या झटापटीत एका नागरिकाला चाकू लागल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक विकास बडवे यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. संशयिताकडून चोरलेली रोकड जप्त करण्यात आली असून, प्राथमिक माहितीनुसार ही रक्कम ३३ लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. जखमी संशयिताला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ (३) नूसार मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.३१३/२०२६ ने.ता.२४/१२/२०२६

अर्जदार :- शुभम विष्णुजी धोटे

वय अं.२७ वर्ष, धंदा-खाजगी नोकरी

रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- सचिव

ग्रामपंचायत कार्यालय कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्यांची आई **मयत लता विष्णुजी धोटे यांचा मृत्यू दि.१२/१२/२००८ रोजी कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त मृत्यूची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **मयत लता विष्णुजी धोटे यांचा मृत्यू दि.१२/१२/२००८ रोजी कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.२४/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/११/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.३४५/२०२६ ने.ता.०२/०१/२०२७

अर्जदार :- पंचफुला लखन अमझिरे

वय अं.४० वर्ष, धंदा-गृहिणी

रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- सचिव साहेब

ग्रामपंचायत कार्यालय लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **यांनी त्यांची मुलगी नामे वैष्णवी लखन अमझिरे हिचा जन्म दि.२२/१०/२०२२ रोजी मु.पो.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदाराची **मुलगी नामे वैष्णवी लखन अमझिरे हिचा जन्म दि.२२/१०/२०२२ रोजी मु.पो.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती**येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.०२/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/११/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ (३) नूसार मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.३२४/२०२६ ने.ता.२८/१२/२०२६

अर्जदार :- सुनिल विठ्ठलराव सावंत

वय अं.४७ वर्ष, धंदा-शेती

रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी

नगर परिषद शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्यांचे आजोबा (वडीलाचे वडील) नामे **मयत महादेव तुकाराम सावंत यांचा मृत्यू दि.१५/०७/१९८० रोजी शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त मृत्यूची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **मयत महादेव तुकाराम सावंत यांचा मृत्यू दि.१५/०७/१९८० रोजी शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.२८/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/११/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ (३) नूसार मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.३१४/२०२६ ने.ता.२१/१२/२०२६

अर्जदार :- सौ.संगिता संजय कविटकर

वय अं.५५ वर्ष, धंदा-गृहिणी

रा.भवानी चौक, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी

नगर परिषद कार्यालय वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी त्यांचे वडील **मयत देवराव भगवानजी वरखेडकर यांचा मृत्यू दि.१६/११/२००१ रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त मृत्यूची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **मयत देवराव भगवानजी वरखेडकर यांचा मृत्यू दि.१६/११/२००१ रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.२१/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/११/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

'तारळी प्रकल्पा'विरोधात गावकरी आक्रमक : सह्याद्रीच्या निसर्गसंपदेवर घाला घातल्याचा आरोप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



कराड – पाटण तालुक्यातील तारळी येथील एका खासगी कंपनीच्या समुदायातील 'ग्रीन एनर्जी' या कंपनीच्या प्रस्तावित तारळी पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्पावरून आता पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांमधून तीव्र विरोध होताना दिसत आहे. या प्रकल्पाच्या कामामुळे सह्याद्रीच्या निसर्गसंपदेवर घाला घातला जात असल्याचा आरोप होत असून जंगलतोड, बेकायदा माती उत्खनन आणि तारळी धरणाच्या जलाशयात मातीचा भराव टाकण्याच्या प्रकारांमुळे पर्यावरणप्रेमींमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. सोशल मीडियावरही याबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तारळी परिसरात ग्रीन एनर्जी कंपनीमार्फत सुमारे १ हजार ५०० मेगावॉट क्षमतेचा पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी तारळे, निवडे, तोंडोशी, कळंबे आणि जळव या गावांमधील जवळपास दीडशे एकरांपेक्षा अधिक खासगी जमीन संपादित करण्यात आल्याची माहिती आहे. या प्रकल्पामध्ये तारळी धरणातील पाण्याचा वापर करून वरच्या आणि खालच्या जलाशयांमध्ये पाण्याची आवर्त वाहतूक केली जाणार असून, त्याद्वारे वीज निर्मिती केली जाणार आहे. सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या हद्दीशी संबंधित संवेदनशील परिसरात हे काम सुरू असल्याचा मुद्दाही उपस्थित होत आहे. त्यामुळे वनविभाग, पर्यावरण विभाग आणि संबंधित प्रशासनाने या कामांची सखोल चौकशी करावी,

जाहीर नोटीस

रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ चे कलम १३ (३) नूसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होणेबाबात. वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर न्यायदंडाधिकारी साहेब (प्रथम श्रेणी) यांचे न्यायालयात.

एम.जे.सी.क्रं.३१८/२०२६ ने.ता.२१/१२/२०२६

अर्जदार :- सैय्यद मुश्ताक सय्यद बब्बु

वय अं.५८ वर्ष, धंदा-मजुरी

रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी साहेब

नगर परिषद वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे सैय्यद मुश्ताक सय्यद बब्बु याचा जन्म दि.२५/१०/१९६८ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्माची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार **नामे सैय्यद मुश्ताक सय्यद बब्बु याचा जन्म दि.२५/१०/१९६८ रोजी मु.पो.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती**येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी **दि.२१/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/११/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश (प्रभारी) (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.२४५/२०२६ ने.ता.०३/१२/२०२६

अर्जदार :-

रामदास नारायणराव देशमुख

वय अं.६५ वर्ष, धंदा-शेती

रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत गंगुबाई लक्ष्मणराव देशमुख, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०३/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश (प्रभारी) (कनिष्ठ स्तर) वरुड यांचे न्यायालयात

एम.जे.सी.क्रं.९००/२०२६ ने.ता.११/१२/२०२६

अर्जदार :-

निर्मला तुकारामजी खोब्रागडे

वय अं.४९ वर्ष, धंदा-गृहिणी

रा.मलकापुर, शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- **निरंक (कोणीही नाही)**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत तुकाराम अभिमान खोब्रागडे, रा.मलकापुर, शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड

जाहीर नोटीस

जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ (३) अन्वये मृत्युची/जन्म नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत. वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यायाधिश, वरुड यांचे न्यायालयात.

कि.फौ.अर्ज.क्रं.३१९/२०२६ ने.ता.२८/१२/२०२६

अर्जदार :- श्रीकांत अजय पंधरे

वय अं.२२ वर्ष, धंदा-शिक्षण

रा.जयगुरुदेव नगर मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

... विरुध्द ...

गैरअर्जदार :- मा.मुख्याधिकारी साहेब

ग्रा.प.कार्यालय लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदाराची **आई नामे अर्चना अजय पंधरे यांचा मृत्यू दि.३०/१०/२००५ रोजी रा.लोणी, ता.वरुड** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त मृत्यूची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) नुसार मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या **अर्चना अजय पंधरे यांचा मृत्यू दि.३०/१०/२००५ रोजी रा.लोणी, ता.वरुड** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२८/१२/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०४/११/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड



'समान काम, समान वेतन' मागणीसाठी न्यायालयीन कर्मचारी संपावर

वरुड न्यायालयाचे कामकाज ठप्प : शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने संताप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



वरुड – उच्च न्यायालयीन कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनात सुधारणा करण्यात यावी आणि समान काम, समान वेतन या प्रमुख मागणीसाठी शासनाकडे सर्व प्रकारे रीतसर मार्ग अवलंबूनही तोडगा निघाला नसल्याने अखर आजपासुन राज्यातील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी संप पुकारल्याने वरुड न्यायालयाचे संपुर्ण कामकाज ठप्प झाले आहे.

आज सकाळपासुनच कर्मचारी कामावर रुजू न झाल्याने आणि न्यायालयीन परिसरातच ठिय्या दिल्याने आधीच अद्यादेश मगच माघार असा ठाम निर्धार न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी केल्याने आता हा संप किती दिवस चालतो? यावर बरेच काही अवलंबून आहे. गेल्या अनेक दिवसांपासून आम्ही आमच्या हक्काचे न्याय मागण्यासाठी शासन दरबारी शासनाचा उंबरठा झिझवला आहे परंतु आम्हाला आमच्या हक्काचे न्याय देण्यासाठी शासन दिरंगाई करीत आहेत. आमच्या महासंघाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यालयात चकरा मारु मारु आम्हाला न्याय मिळाला नाही म्हणुन आम्ही दोन दिवस काळी फीत लावून निषेध नोंदविला होता. त्यावर ही शासनाने काही पाऊल उचलले नाही तसेच आम्हाला एक दिवसीय सामुहिकपणे रजा आंदोलन करण्याचें संपूर्ण महाराष्ट्रात ३४ हजार कर्मचारी यांनी अर्ज दाखल केले होते,

परंतु काही कारणास्तव आम्हाला ती घेण्यासाठी बाद्य केले त्यामुळे आम्ही आज १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. जोपर्यंत शासन दरबारातुन जी आर निघणार नाही तोपर्यंत आम्ही काम बंद आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

समान काम समान वेतन दुरुस्ती करून मिळणार नाही तोपर्यंत संप सुरु राहणार आहे, असल्याचे यावेळी संपकर्त्या कर्मचाऱ्यांनी सांगितले. या संपामध्ये अमरावती जिल्हा न्यायालयीन बैलीफ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष शंकर हनवते यांचे मार्गदर्शनात स्थानिक जिल्हा व सत्र न्यायालयातील अधिक्षक संघटनेचे पदाधिकारी रामसिंग सुर्यवंशी, कर्मचारी चारुदत्त किनगे, राजेंद्र देशमुख, आंकाश मुंढे, नंदु तंतरपाळे, सुरज रुद्रकार, राजेश मुळे, मनोज घोडके, अमन कोकरे, प्रतिक कटकमवार, मुकेश वाघमारे, ढगेश्वर शेळके, रितेश नारळे, दिनेश ठाकरे, अमोल सोनोने, सोनाली ठाकरे, जया मेश्राम, प्रियंका पोटे, अश्विनी वाघमारे, सचिन निस्ताने, पी.पी.शेवळे, महेश जाधव, राहुल वाट आदी कर्मचारी सहभागी झाले होते.

एकमताने निर्णय झाल्याचा पुरावा नाही : निवडणूक आयोगाच्या दाव्याला याचिकाकर्त्याचे आव्हान

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

नवी दिल्ली – मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाबाबत (एसआयआर) घेण्यात आलेल्या निर्णयांना निवडणूक आयोगाच्या तिन्ही सदस्यांनी एकमताने मंजुरी दिल्याचे सिद्ध करणारी कागदपत्रे भारतीय निवडणूक आयोगाने (ईसीआय) सादर केलेली नाहीत, असा दावा याचिकाकर्त्याने सर्वोच्च न्यायालयात केला आहे. ॲडव्होकेट ऑन रेकॉर्ड मुदित गुप्ता यांच्यामार्फत याचिकाकर्ते राकेश कुमार सिंह यांनी दाखल केलेल्या प्रत्युत्तर प्रतिज्ञापत्रात आयोगाचा दावा फेटाळून लावला आहे. एसआयआरसंदर्भातील सर्व निर्णय एकमताने घेण्यात आल्याचे आयोगाने म्हटले असले, तरी त्यासंबंधीचे कोणतेही अधिकृत अभिलेख सादर करण्यात आलेले नाहीत, असे त्यांनी म्हटले आहे. एकमताचा पुरवा नाहीयाचिका दाखल झाल्यानंतर करण्यात आलेल्या सुधारणांमुळे पूर्वीचे निर्णय वैध ठरत नाहीत.

ठाणे पोलीस आयुक्तांचे व्हॉट्सॲप खाते हॅक : स्टेट्सवर २० अश्लील चित्रफिती



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

ठाणे – ठाणे शहराचे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांचे व्हॉट्सॲप खातेच सायबर गुन्हेगारांच्या निशाण्यावर आल्याचा धक्कादायक प्रकार मंगळवारी सायंकाळी उघडकीस आला. त्यांच्या व्हॉट्सॲप स्टेट्सवर अचानक अश्लील चित्रफिती प्रसारित होऊ लागल्याने पोलीस दलात मोठी खळबळ उडाली. अवघ्या काही मिनिटांत टप्प्याटप्प्याने सुमारे २० आक्षेपार्ह चित्रफिती अपलोड करण्यात आल्या. हा प्रकार लक्षात येताच पोलीस यंत्रणा तातडीने सक्रिय झाली. अखेर सायंकाळी सहाच्या सुमारास सर्व चित्रफिती हटविण्यात यश आले. मंगळवारी सायंकाळी ४ वाजून ४६ मिनिटांच्या सुमारास आयुक्तांच्या व्हॉट्सॲप स्टेट्सवर पहिली अश्लील चित्रफीत दिसून आली. त्यानंतर काही वेळातच एकापाठोपाठ अन्य चित्रफिती अपलोड होऊ लागल्या.

महिला सरपंचाची थेट मुख्यमंत्री फडणवीसांकडे तक्रार अन ८ राज्यातील ५० हजार

सरपंचांच्या फसवणुकीचा पर्दाफाश : मध्यप्रदेशात धडाकेबाज कारवाई, ३५ महिलांना अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



नागपूर – महाराष्ट्रासह देशभरातील महिला सरपंच आणि ग्रामसेवकांना टार्गेट करून खंडणी उकळणारया एका आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश नागपूर ग्रामीण पोलिसांनी केला आहे.

विशेष बाब म्हणजे काही दिवसांपूर्वी नागपुरातील लोहारी सावंगा गावात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक गावातील सरपंचांसोबत दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर संवाद साधला होता.

तेव्हा काही महिला सरपंचांनी ;'श्रेष्ठ न्यूज' या नावाने परिसरातील अनेक महिला सरपंच आणि ग्रामसेवकांना फोन करून पैसे मागितले जात असल्याची तक्रार मुख्यमंत्र्यांसमोर केली होती. पहिला फोन आल्यानंतर महिला सरपंच आणि ग्रामसेवकांनी मागितलेले पैसे ऑनलाइन न पाठवल्यास ग्रामपंचायतीच्या कामात तुम्ही भ्रष्टाचार केला आहे, निधीची अफरातफर केली आहे, असे खोटे आरोप करत खंडणी उकळली जात असल्याचे ही महिला सरपंचांनी मुख्यमंत्र्यांना सांगितले होते.

दरम्यान, महिला सरपंचांच्या तक्रारीनंतर मुख्यमंत्र्यांनी नागपूर ग्रामीण पोलिसांना यासंदर्भात गुन्हा दाखल करून तपास करण्याचे निर्देश दिले होते. नागपूर ग्रामीण पोलिसांनी सर्व प्रकरणाचा तपास करून मध्य प्रदेशातील भोपाळ मधून ३५ महिलांना ताब्यात घेतले आहे.

दाघिनी भोपाळमध्ये हर्षवर्धन नगर, निषाकपुरा आणि एमपी नगर परिसरात तीन कॉल सेंटर उभारून तिथून महाराष्ट्रातील महिला सरपंच आणि ग्रामसेवकांना फोन करून आधी जाहिरातीसाठी पैसे मागण्याचा, त्यानंतर गावातील विकास कामात भ्रष्टाचार केल्याचा खोटा आरोप करत खंडणी उकळण्याचा सपाटा लावला होता. शिवाय त्यांची कार्यपद्धतीही अत्यंत धक्कादायक होती.

वेतनश्रेणीच्या मागणीसाठी न्यायालयीन कामकाज ठप्प

संपात राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी सहभागी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



मुंबई – उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणी लागू करावी आणि समान काम समान वेतन या तत्त्वाची अंमलबजावणी करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या वतीने १७ नोव्हेंबरपासून राज्यव्यापी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. या संपात राज्यातील सुमारे ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी सहभागी झाले असून पालघर, वसई, ठाणे, कल्याण, नवी मुंबई, भाईंदर, उल्हासनगर, कर्जत आणि भिवंडी येथील न्यायालयीन कर्मचाऱ्यांनीही आंदोलनात सहभाग घेतला आहे. मुंबई उच्च न्यायालय आणि त्याच्या सर्व खंडपीठांतील विविध संवर्गांतील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत २०२३ मध्ये सुधारणा करण्यात आली होती. त्याच धर्तीवर दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही सुधारित वेतनश्रेणीचा लाभ मिळावा, अशी मागणी कर्मचारी संघटनांनी फेब्रुवारी २०२४ मध्ये उच्च न्यायालयाकडे निवेदनाद्वारे केली होती. उच्च न्यायालयाने संबंधित प्रस्ताव शासनाकडे पाठवूनही विधी व न्याय तसेच वित्त विभागाकडून निर्णय घेण्यात आलेला नसल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघ (गट-क व गट-ड), महाराष्ट्र राज्य न्यायालयीन बेलीफ महासंघ तसेच महाराष्ट्र राज्य स्टेनोग्राफर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पुकारण्यात आलेल्या बेमुदत संपाला संपूर्ण महाराष्ट्र राज्यात १०० टक्के प्रतिसाद मिळाला आहे.



